# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ४/०८/२०२३ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक-३९५** **विषय क्रमांक – ३९५**

**दिनांक- ४/०८/२०२३** **खाते - मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| **विषय क्रमांक-३९५**<br>**दिनांक-४/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अग्नि/४/कावि/२२५/२०२३ दि.२५/०७/२०२३ अन्वये, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम सुधारणा २०२३ च्या निर्देशानुसार अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी चे महापालिका क्षेत्रात दर निश्चित करणेबाबत. |
| **ठराव क्र. ३९५**<br>**दिनांक-४/०८/२०२३** | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अग्नि/४/कावि/२२५/२०२३ दि.२५/०७/२०२३ अन्वये, महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२४, दि.११/०५/२०२३ नुसार राज्य शासनाने अग्निशमन कायद्यात सुधारणा केली आहे अधिनियमातील कलम ११ (१) आणि (२) मध्ये बदल करून, अग्निशमन फीच्या आकारणीत सुधारणा केली आहे. अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी आकारणी मधील हे बदल महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) अन्वये तयार केलेल्या महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तविक बाजारमुल्य निर्धारित करणे) नियम १९९५ चे तरतुदी अन्वये प्रसिध्द केलेल्या वाढीव दर विवरण (एएसआर) टक्केवारी अनुसार इमारतीच्या विविध प्रवर्गासाठी बांधीव क्षेत्राच्या प्रती चौरस मीटर प्रमाणे आकारण्यात यावे असे स्पष्ट केले आहे. अग्निशमन सेवा पुरविणेसाठी केंद्रांची उभारणी, वाहने, उपकरणे यांची खरेदी, विशेष वापराची (स्पेशल पर्पज) वाहने-उपकरणे यांची उपलब्धता, त्याची नियमित देखभाल दुरुस्ती यांची व्यवस्था, प्रशिक्षित असा सेवकवर्ग नेमणे, त्यांचे वेतन, गणवेश व तदनुषंगिक सुविधा पुरविणे, त्याकरीता आर्थिक तरदूत आवश्यक असते. अग्निशमन सेवा फी व वार्षिक फी द्वारे जमा होणारी रक्कम ही अग्निशमन विभागाचे महसूलाचे स्त्रोत आहे. सदर बाबींचा विचार करून अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी मध्ये वाढ करणे अपरिहार्य असल्याने, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) अन्वये तयार केलेल्या महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तविक बाजारमुल्य निर्धारित करणे) नियम १९९५ चे तरतुदी अन्वये दर विवरण (एएसआर) टक्केवारी नुसार इमारतीच्या विविध प्रवर्गासाठी स्थुल बांधीव क्षेत्राच्या (Gross Built-up Area) च्या प्रती चौरस मीटर प्रमाणे सुधारित दराने खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे आकारणी करणे कामी मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| अ.क्र. | इमारतीची उंची मीटरमध्ये | वार्षिक दर विवरणपत्राच्या टक्केवारीनुसार ( एएसआर ) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | निवासी | संस्थेची इमारत | वाणिज्यिक | औद्योगिक |

<table>
<tr><td></td><td>
<table>
<tr><td>१</td><td>४५ मी. पर्यंतची इमारत</td><td>०.२५%</td><td>०.५०%</td><td>०.७५%</td><td>०.७५%</td></tr>
<tr><td>२</td><td>४५ मी. पेक्षा उंच इमारत</td><td>०.७५%</td><td>१.००%</td><td>१.२५%</td><td>१.००%</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>निर्णय</td><td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td></tr>
</table>

सही/-
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**